0 3 JUL 2022
पुण्यनगरी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर


# गुणवंत महाविद्यालयांच्या प्राचार्यांचा विद्यापीठात गुणगौरव

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मधील 'शिवाजी विद्यापीठ गुणवत्ता शिष्यवृत्ती' प्राप्त गुणवंत महाविद्यालयांच्या प्राचार्यांचा आणि अधिविभागप्रमुखांचा गुणगौरव समारंभ विद्यापीठात झाला. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के होते, तर प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, डॉ. आर. के. कामत प्रमुख उपस्थित होते.

यावेळी नऊ महाविद्यालये आणि एका अधिविभागाचा गौरव करण्यात आला. यामध्ये विद्यापीठाचा तंत्रज्ञान अधिविभाग, शिवराज कॉलेज ऑफ आर्टस् अ‍ॅन्ड कॉमर्स आणि डी. एस. कदम सायन्स कॉलेज गडहिंग्लज, दूधसाखर महाविद्यालय बिद्री, देशभक्त रत्नाप्पा कुंभार कॉलेज ऑफ कॉमर्स कोल्हापूर, डॉ. घाळी कॉलेज गडहिंग्लज, पद्मभूषण वसंतरावदादा पाटील महाविद्यालय, कवठेमहांकाळ (सांगली), दि न्यू कॉलेज कोल्हापूर, डी. आर. माने महाविद्यालय कागल, पद्मभूषण डॉ. क्रांतिवीर नागनाथअण्णा नायकवडी आर्टस् कॉलेज झरे, डेक्कन कॉलेज ऑफ इंटेरिअर डिझाईन, कोल्हापूर यांचा समावेश होता. डॉ. व्ही. एम. पाटील, डॉ. एम. के. पाटील, डॉ. मंगलकुमार पाटील, डॉ. व्ही. ए. पाटील, डॉ. एस. डी. पाटील, डॉ. एस. एम. कदम, डॉ. ए. बी. कोळेकर यांचा समावेश होता.

प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी प्रास्ताविक केले, तर उपकुलसचिव बी. एम. नाळे यांनी आभार मानले. अभिजित लिंग्रस यांनी सूत्रसंचालन केले.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी.एस. पाटील यांच्यासमवेत संलग्नित गुणवंत महाविद्यालयांचे प्राचार्य.

जनसंपर्क कक्ष
0 3 JUL 2022 सकाळ शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# चित्रपट निर्मितीची कार्यशाळा उपयोगी

## डॉ. काकडे; विद्यापीठातील फिल्म मेकिंग कार्यशाळेला प्रतिसाद

**कोल्हापूर, ता. २ :** डिजिटल माध्यमांमुळे मनोरंजन क्षेत्रात अनेक नवीन संधी निर्माण झाल्या आहेत. चित्रपट निर्मितीचे तंत्रज्ञान सर्वत्र उपलब्ध झाले. अशा काळातही चित्रपट निर्मितीची कार्यशाळा विद्यार्थ्यांना उपयोगी ठरेल, असे प्रतिपादन विजापूर येथील अक्कमहादेवी महिला विद्यापीठाचे माजी कुलगुरू आणि जर्नालिझम व मास कम्युनिकेशन विभागप्रमुख प्रा. डॉ. ओंकार काकडे यांनी केले. शिवाजी विद्यापीठात झालेल्या 'फिल्म मेकिंग' कार्यशाळेच्या उद्‌घाटनप्रसंगी ते बोलत होते.

काकडे यांच्या हस्ते रोपट्याला पाणी घालून कार्यशाळेचे उद्‌घाटन झाले. विभागप्रमुख प्रा. डॉ. निशा पवार यांनी स्वागत केले. याप्रसंगी लघुपटांना राष्ट्रीय स्तरावर पारितोषिक मिळवलेल्या विभागाचे विद्यार्थी सोमदत्त देसाई, मल्हार जोशी आणि आकाश बोकमूरकर यांचा सत्कार झाला. दुसऱ्या सत्रात चित्रपट समीक्षक डॉ. अनमोल कोठाडिया यांनी मार्गदर्शन केले. 'एखाद्या चित्रपटाचे दिग्दर्शन करणे म्हणजे त्या चित्रपटात त्या दिग्दर्शकाचा रोख पाहायला मिळतो. चित्रपट म्हणजे काय हे समजसाठी वैविध्यपूर्ण सिनेमे पाहणे आणि त्यातील विषय, आशय समजावून घेणे गरजेचे आहे. चित्रपटातून मांडलेल्या जाणिवांतून माणूस म्हणून जगता यावे. मानवी मूल्यांचे संवर्धन करणारी सृजनशील कलाकृती साकारणे म्हणजे चित्रपट निर्मिती करणे', असे मत त्यांनी व्यक्त केले. डॉ. कोठडिया यांनी 'ग्लास' आणि आर यु व्हॅलीबॉल या डॉक्युमेंटरी आणि शॉर्ट फिल्मच्या माध्यमांतून चित्रपट आणि लघुपट निर्मिती कशी केली जाते हे सांगितले. लेखक-निर्माते-दिग्दर्शक अनुप जत्राटकर यांनी चित्रपट बनवण्यासाठी लागणाऱ्या कलांची माहिती देत व्हिडिओग्राफी आणि दिग्दर्शन याबाबत मार्गदर्शन केले. चित्रपटामध्ये वापरण्यात येणाऱ्या तंत्रज्ञानाची माहिती दिली. चित्रपट समजून घेताना त्याच्या तांत्रिक बाजू समजून घेणे आवश्यक असल्याचे मत त्यांनी व्यक्त केले. दुसऱ्या दिवशी फोटोग्राफर, व्हिडिओग्राफार आणि एडिटर असोसिएशनचे अध्यक्ष जगदीश गुरव यांनी चित्रपट एडिटिंगमधील विविध पैलू सहभागी विद्यार्थ्यांना समजावून सांगितले. संगीत संयोजक ऐश्वर्य मालगावे यांनी चित्रपट निर्मितीत संगीताची निवड आणि योग्य संगीताचा वापर यासंबंधी मार्गदर्शन केले. यावेळी प्रा. डॉ. शिवाजी जाधव, प्राध्यापक सचिन दिवाण, प्रा. आनंदा पांढरबळे, प्रा. दिग्विजय कुंभार आदी उपस्थित होते.



**कोल्हापूर : चित्रपट निर्मिती कार्यशाळेच्या उद्‌घाटनप्रसंगी प्रा. डॉ. ओंकार काकडे, अनुप जत्राटकर, , डॉ. अनमोल कोठाडिया, प्रा. डॉ. निशा पवार.**

03 JUL 2022

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# खाल्ल्या मिठाला जागा

**मराठीमध्ये सुतावरून स्वर्ग गाठणे ही म्हण प्रचलित आहे. या म्हणीचा संदर्भ बहुधा एखाद्या गुन्ह्याच्या तपासामध्ये दिला जातो. परंतु असेच एकदा एका बंदिस्त ठिकाणी किती लोक आहेत याचा अंदाज हा त्यांना पुरविल्या गेलेल्या अन्नामध्ये वापरलेल्या मिठाच्या प्रमाणावरून बांधला गेला होता. तो कसा हे सांगणारी एक घटना...**

१९४७ साली भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर लगेचच जातीय दंगली उसळल्या होत्या. यावेळी अल्पसंख्याक समुदायातील बऱ्याच निर्वासित लोकांनी दिल्ली येथील लाल किल्ला व हुमायूनची कबर या ठिकाणी आश्रय घेतला होता. लाल किल्ला येथे असणाऱ्या निर्वासितांची संख्या ही हुमायूनची कबर येथे असणाऱ्या लोकांच्या संख्येपेक्षा तुलनेने अधिक होती. या सर्व निर्वासितांच्या अन्न-पाण्याची जबाबदारी ही सरकारकडे होती. सरकारने हे काम काही कंत्राटदारांकडे सोपविले होते. हे काम सोपवीत असताना लाल किल्ल्यामध्ये नेमके किती निर्वासित आहेत याची संख्या किंवा अंदाजे संख्यासुद्धा कोणाकडेच नव्हती. तसेच परिस्थिती नाजूक असल्याने लाल किल्ल्यामध्ये जाऊन त्यांची संख्या मोजणेही शक्य नव्हते. त्यामुळे प्रचलित पद्धतीप्रमाणे म्हणजे 'प्रतिदिन - प्रतिव्यक्ती' इतका खर्च असे कंत्राट देता येत नव्हते. त्यामुळे कंत्राटदार वेगवेगळ्या वस्तूंची (डाळ, तांदूळ/भात, चटणी, मीठ ई.) जी बिले सादर करीत तेवढी रक्कम सरकारला त्यांना द्यावी लागत असे आणि पर्यायाने सरकारचा खर्च हा खूपच होत होता. अशावेळी एखाद्या तज्ज्ञ व्यक्तीकडून लाल किल्ल्यामध्ये अंदाजे किती निर्वासित आहेत त्याची संख्या मिळवावी जेणेकरून 'प्रतिदिन - प्रतिव्यक्ती' अमुक एक रक्कम कंत्राटदारांना देता येईल, असे सरकारकडून ठरविण्यात आले. त्यावेळेला ज्या शास्त्राचा उपयोग होईल, असे सरकारला वाटले ते शास्त्र म्हणजेच 'संख्याशास्त्र'. म्हणून सरकारकडून त्यावेळचे 'भारतीय सांख्यिकी संस्था' येथील संख्याशास्त्रज्ञ जे. एम. सेनगुप्ता यांना बोलाविण्यात आले.

लाल किल्ल्यामध्ये प्रवेश करता येत नसल्याने अंदाज बांधणे संख्याशास्त्रज्ञांसाठीसुद्धा कठीण होते. त्यांनी लाल किल्ल्यात प्रवेश न करता कंत्राटदारांनी सरकारकडे दर दिवशी जमा केलेल्या बिलांचा व उपभोग पाहणी (Consumption surveys) अहवालाचा आधार घेतला. उपभोग पाहणी अहवालामध्ये वेगवेगळ्या वस्तूंची उदा. डाळ, तांदूळ/भात, चटणी, मीठ 'प्रतिदिन - प्रतिव्यक्ती' असणारी गरज दिलेली असते. तांदूळ/भात, डाळी व मीठ या वस्तूंची प्रतिदिन-प्रतिव्यक्ती असणारी गरज व कंत्राटदारांनी जमा केलेल्या बिलामधील एका दिवसासाठी एकूण खरेदी केलेला तांदूळ/भात, डाळी व मीठ यांचे गुणोत्तर काढले तर ते येणारे गुणोत्तर हे लाल किल्ल्यामध्ये असणाऱ्या लोकांची अंदाजे संख्या म्हणून वापरू शकतो असे संख्याशास्त्रज्ञांनी ठरविले. अधिक विस्ताराने सांगायचे झाले तर समजा कंत्राटदाराने एका दिवसासाठी १०० किलो म्हणजेच १,००,००० ग्रॅम तांदूळ खरेदी केला असेल व उपभोग पाहणी अहवालामधून 'प्रतिदिन - प्रतिव्यक्ती' तांदळाची गरज ही २५० ग्रॅम अशी सांगितली असेल तर, १,००,००० ला २५० ने भागले असता येणारे उत्तर ४०० ही लाल किल्ल्यामध्ये असणाऱ्या लोकांची अंदाजे संख्या आहे असे आपण मानू शकतो. हीच पद्धत संख्याशास्त्रज्ञांनी वापरून तांदूळ/भाताच्या बिलावरून, डाळीच्या बिलावरून व मिठाच्या बिलावरून स्वतंत्रपणे लाल किल्ल्यामध्ये असणाऱ्या लोकांची अंदाजे संख्या काढली. अपेक्षित असे होते की, या तीनही वस्तूंवरून आलेली लोकांची अंदाजे संख्या ही जवळ जवळ सारखीच असावी. परंतु त्या तीनही संख्येमध्ये खूप तफावत होती. मिठावरून आलेली संख्या ही सर्वात कमी होती तर तांदूळ/भातावरून आलेली संख्या ही सर्वात जास्त होती. मग या तीनही वस्तूंवरून आलेल्या संख्येपैकी नेमकी कोणती संख्या गृहीत धरावी, असा प्रश्न संख्याशास्त्रज्ञांसमोर होता. संख्याशास्त्रज्ञांनी अजून काही गोष्टींचा विचार केला. त्यावेळी या तीन वस्तूंमध्ये मिठाची किंमत सर्वात कमी तर तांदळाची किंमत सर्वात जास्त होती. त्यामुळे बिलामध्ये तांदळाच्या खरेदीमध्ये वास्तविक खरेदीपेक्षा अधिक खरेदी नमूद केली असण्याची शक्यता होती. मिठाची किंमत खूपच कमी असल्याने मिठाची खरेदी अधिक नमूद करून कंत्राटदारांना अधिकच फायदा कमवता येणार नव्हता. त्यामुळे मिठावरून आलेली संख्या ही लाल किल्ल्यामध्ये असणाऱ्या लोकांची अंदाजे संख्या गृहीत धरण्यात आली. लाल किल्ल्यामध्ये असणाऱ्या लोकांची अंदाजे संख्या काढण्यासाठी वापरलेल्या वरील पद्धतीची बिनचूकता तपासण्यासाठी हुमायूनची कबर या ठिकाणी असणाऱ्या लोकांची संख्या अशाच पद्धतीने काढण्यात आली व ती त्याठिकाणी असलेल्या वास्तविक संख्येसोबत तुलना केली असता ती जवळपास एकसारखी आली. त्यामुळे या संख्याशास्त्रीय पद्धतीवर आक्षेप घेण्याचे कारणच राहिले नाही.

•••

- प्रा. लतिका शिंदे, मलकापूर
- प्रा. सोमनाथ पवार, कोल्हापूर

जनसंपर्क कक्ष
03 JUL 2022
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
लोकमत

# भगवान महावीर अध्यासनाला देणगी

## ज्येष्ठ प्राचार्य श्रीधर हेरवाडे यांनी एक लाख दिले

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या भगवान महावीर अध्यासनाच्या प्रस्तावित इमारतीच्या बांधकामासाठी ज्येष्ठ प्राचार्य श्रीधर हेरवाडे यांनी एक लाख अकरा हजार एकशे अकरा रुपयांची देणगी दिली. रुदिनी भगवान महावीर अध्यास्नाचे प्राध्यापक डॉ. विजय ककडे यांच्याकडे त्यांनी हा निधी सुपुर्द केला.

प्राचार्य हेरवाडे भगवान महावीर अध्यासनाच्या सल्लागार समितीवर मार्गदर्शक असून, त्यांनी जैन धर्माचे तत्त्वज्ञान यावर विपुल लिखाण केले आहे, त्यांच्या या देणगीबद्दल कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, देणगी संकलन समितीचे अध्यक्ष डॉ. जे. ऐफ. पाटील, वित्त व लेखाधिकारी अजित चौगुले यांनी धन्यवाद दिले आहेत. अध्यासनाच्या इमारत बांधकामास सर्व दानशूर, अहिंसाप्रेमी व्यक्ती आणि संस्थांनी सढळ हस्ते मदत करावी, असे आवाहन डॉ. विजय ककडे यांनी केले आहे.



कोल्हापुरात गुरुवारी डॉ. विजय ककडे यांच्याकडे प्राचार्य श्रीधर हेरवाडे यांनी देणगी निधी सुपूर्द केला.

पुढारी

# शिवाजी विद्यापीठात वृक्षारोपण

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील एम.बी.ए. युनिटमार्फत वृक्षारोपण मोहीम राबविण्यात आली. यावेळी युनिटच्या प्र. संचालक प्रा. डॉ. एस.एस. महाजन, प्रा. डॉ. दीपा इंगवले, डॉ. अनुप मुळे, डॉ. गंधाली खारगे, डॉ. रामदास बोलके व विभागातील विद्यार्थी व विद्यार्थिनी उपस्थित होते.

0 3 JUL 2022 पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# महावीर अध्यासनासाठी प्राचार्य हेरवाडेंकडून देणगी

कोल्हापूर : प्रतिनिधी

शिवाजी विद्यापीठाच्या भगवान महावीर अध्यासनाच्या प्रस्तावित इमारत बांधकामासाठी प्राचार्य श्रीधर हेरवाडे यांनी १ लाख ११ हजार १११ रुपयांची देणगी दिली आहे. अध्यासनाचे प्राध्यापक डॉ. विजय ककडे यांच्याकडे त्यांनी हा निधी सुपूर्द केला.

प्राचार्य हेरवाडे भगवान महावीर अध्यासनाच्या सल्लागार समितीवर मार्गदर्शक असून, त्यांनी जैन धर्म तत्त्वज्ञान यावर विपुल लिखाण केले आहे, व्याख्याने दिली आहेत. देणगीबद्दल कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, देणगी संकलन समितीचे अध्यक्ष डॉ. जे. एफ. पाटील, तसेच वित्त व लेखाधिकारी अजित चौगुले यांनी धन्यवाद दिले.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या भगवान महावीर अध्यासनाचे प्राध्यापक डॉ. विजय ककडे यांच्याकडे देणगी निधी सुपूर्द करताना प्राचार्य श्रीधर हेरवाडे.

सकाळ

# महावीर अध्यासन इमारतीसाठी प्राचार्य हेरवाडेंकडून १ लाख ११ हजार



**कोल्हापूर : प्रा. डॉ. विजय ककडे यांच्याकडे देणगी निधी सुपूर्द करताना प्राचार्य श्रीधर हेरवाडे.**

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या भगवान महावीर अध्यासनाच्या प्रस्तावित इमारत बांधकामासाठी प्राचार्य श्रीधर हेरवाडे यांनी १ लाख ११ हजार एकशे अकरा रुपयांची देणगी दिली. गुरुपुष्यामृतदिनी अध्यासनाचे प्रा. डॉ. विजय ककडे यांच्याकडे त्यांनी निधी सुपूर्द केला. प्राचार्य हेरवाडे भगवान महावीर अध्यासनाच्या सल्लागार समितीवर मार्गदर्शक असून, त्यांनी जैन धर्म तत्त्वज्ञानावर विपूल लिखाण केले आहे. व्याख्याने दिली आहेत. त्यांच्या या देणगीबद्दल कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, देणगी संकलन समितीचे अध्यक्ष डॉ. जे. एफ. पाटील, प्रभारी वित्त व लेखाधिकारी अजित चौगुले यांनी आभार मानले. महावीर अध्यासनाच्या इमारत बांधकामास सर्व दानशूर व्यक्ती व संस्थांनी मदत करावी, असे आवाहन डॉ. ककडे यांनी केले.